| | | | |
|---|---|---|---|
| MHAH030078652023 | केस दाखल दिनांक | - | ३०/०८/२०२३ |
| | केस नोंदणी दिनांक | - | १३/०९/२०२३ |
| | केस निकाल दिनांक | - | ०१/०६/२०२६ |
| | कालावधी | - | वर्ष महिने दिवस<br>०२ – ०९ - ०२ |

अहमदनगर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. १, अहमदनगर
यांचे न्यायालयात...
(पीठासीन अधिकारी - श्रीमती ए.बी. पाटिल )

नियमीत फौजदारी खटला क्र. ८९३/२०२३ निशाणी क्र.४२
(**CNR No.**MHAH030078652023)

| | |
|---|---|
| | गु. र. नं. । ३४१/२०२३<br>पोलीस स्टेशन -नगर तालुका पोलिस स्टेशन, अहमदनगर. |
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन मार्फत नगर तालुका पोलिस स्टेशन, अहमदनगर.<br>(तक्रारदार – रावसाहेब ज्ञानदेव जाधव) |
| प्रतिनिधीत्व | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.के.ए.उबाळे |
| आरोपी | १) भारत विठ्ठल घायमुक्ते, वय - ४० वर्षे,<br>२ ) जितेंद्र उर्फ खंडु विनायक घायमुक्ते, वय ३४ वर्षे,<br>३) राजेंद्र उर्फ राजाराम दिनकर घायमुक्ते, वय – ४९ वर्षे,<br>४)बाजीराव दिनकर घायमुक्ते, वय – ४३ वर्षे,<br>५) बंटी उर्फ तुषार राजाराम घायमुक्ते, वय – २२ वर्षे,<br>६) दिपक मुरलीधर घायमुक्ते, वय – २४ वर्षे,<br>७) सागर विलास घायमुक्ते, वय – ३५ वर्षे,<br>सर्व रा. देऊळगाव सिध्दी, ता.जिल्हा - अहमदनगर. |
| प्रतिनिधीत्व | आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.ए.ए.सय्यद |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १८/०४/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | १८/०४/२०२३ |
| दोषारोप दाखल दिनांक | ३०/०८/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २३/०१/२०२४ |
| प्रकरणात पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २१/०८/२०२४ |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | ०१/०१/२०२६ |
| शिक्षा सुनाविल्याच्या आदेशाचा दिनांक जर असेल तर | -- |

## आरोपींचा तपशिल

| अ. क्र | आरोपींचे नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | अपराधाचा तपशिल | निर्दोष मुक्त केले किंवा दोषी धरले | शिक्षा आदेश | संपरिक्षे दरम्यान आरोपींचा फौ. प्र. सं. चे कलम ४२८ प्रमाणे स्थानबध्दतेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भारत विठ्ठल घायमुक्ते | ३०.०५.२०२३ | ३१.०५.२०२३ | भा. द. वि.१४३, १४७, ३२७, ३२३ | निर्दोष मुक्त केले | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ,३३६, ५०४, ५०६ कलम प्रमाणे | | | |
| २. | जितेंद्र उर्फ खंडु विनायक घायमुक्ते | ३१.०५.२० २३ | ३१.०५.२० २३ | भा. द. वि.१४३, १४७, ३२७, ३२३ ,३३६, ५०४, ५०६ कलम प्रमाणे | निर्दोष मुक्त केले | -- | – |
| ३. | राजेंद्र उर्फ राजाराम दिनकर घायमुक्ते | ०३.०६.२० २३ | ०३.०६.२० २३ | भा. द. वि.१४३, १४७, ३२७, ३२३ ,३३६, ५०४, ५०६ कलम प्रमाणे | निर्दोष मुक्त केले | -- | – |
| ४. | बाजीराव दिनकर घायमुक्ते | ३०.०५.२० २३ | ३१.०५.२० २३ | भा. द. वि.१४३, १४७, ३२७, ३२३ ,३३६, ५०४, ५०६ कलम प्रमाणे | निर्दोष मुक्त केले | -- | – |
| ५. | बंटी उर्फ तुषार राजाराम घायमुक्ते | ०३.०६.२० २३ | ०३.०६.२० २३ | भा. द. वि.१४३, १४७, ३२७, ३२३ ,३३६, ५०४, ५०६ कलम प्रमाणे | निर्दोष मुक्त केले | -- | – |
| ६. | दिपक मुरलीधर घायमुक्ते | ३१.०५.२० २३ | ३१.०५.२० २३ | भा. द. वि.१४३, १४७, ३२७, ३२३ ,३३६, ५०४, ५०६ कलम प्रमाणे | निर्दोष मुक्त केले | -- | – |
| ७. | सागर विलास घायमुक्ते | ०३.०६.२० २३ | ०३.०६.२० २३ | भा. द. वि.१४३, १४७, ३२७, ३२३ ,३३६, ५०४, ५०६ कलम प्रमाणे | निर्दोष मुक्त केले | -- | – |

न्यायनिर्णय
(घोषित दिनांक ०१ जून २०२६)

अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे -

फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील रहाणारे असून ते एकमेकांशी परिचीत आहेत. फिर्यादी व साक्षीदार व त्यांचे गावातील प्रतिष्ठीत लोकांनी यात्रेनिमीत्त कुस्त्याचा हंगामा भरविण्याचे नियोजन केले होते. फिर्यादी व त्यांचा मुलगा वैभव व त्यांच्या गावातील इतर ग्रामस्थ यांनी दरवर्षी प्रमाणे मारुती मंदिरात नारळ फोडुन कुस्त्याचा हंगाम भरविण्यासाठी बसस्टँण्ड परिसरातून चालत जात असतांना साक्षीदार वैभव जाधव यांनी सुधाकरइंगळे यांना कुस्त्याच्या पंच कमिटीमध्ये कोण कोण आहेत असे विचारले असता आरोपी क्र. १ हा वैभव जाधव यास म्हणाली की ''तुझ्या बापाचे नाव आहे ना कमीटीमध्ये, तु कशाला डोकं चालवतो''. त्यानंतर वैभव जाधव याने '' तुला मी विचारले नाही, मी सुधारक इंगळेयांना विचारले आहे असे म्हणाला. त्यानंतर आरोपी क्र. १ याने वैभव जाधव याच्या कानाखाली मारली. त्यानंतर वैभव जाधव याने देखील आरोपी क्र. १ याच्या कानाखाली मारली. त्यानंतर आरोपी क्र. १ हा रागाने तेथुन निघुन गेला . त्यानंतर फिर्यादी व साक्षीदार हे बस स्टॅण्ड परिसरात कुस्त्याच्या आखाडयाकरीता गेले असता कुस्त्या चालु करण्या अगोदर उभे असतांना आरोपी क्र. १ याने कुस्तीच्या फडात येवुन हातातील देगड फिर्यादी यांना फेकुन मारला. तो दगड फिर्यादीच्या पोटाच्या डाव्या बाजुला लागला. त्यानंतर आरोपी क्र. २,३,४,५,६,७ यांनी फिर्यादी व त्यांचा मुलगा वैभव याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. आरोपी क्र. १ याने फिर्यादी याचा मुलगा वैभव याच्या गळयातील १५ तोळे वजनाची सोन्याची चेन हिसकावुन घेतली . तसेच त्यांच्या भांडणामधे फिर्यादीच्या खिशातील १,५०,०००/- रुपये व मुलगा वैभव याच्या खिशातील रुपये ७०,०००/- असे एकुण २,२०,०००/- गहाळ झाले. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द नगर तालुका पोलिस स्टेशन, अहमदनगर येथे तक्रार दाखल केली.

२) सदरहू तक्रारीवरुन आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६०, चे कलम ३२७, ४२७, ३३६, ३२३, १४३, १४७, १४९, ५०४, ५०६, २०१ प्रमाणे गु.र.क्र.। ३४१/२०२३ नोंदविला. पोलीस उपनिरीक्षक आर. एफ. मारग यांनी घटनेचा तपास केला व आरोपींविरूध्द गुन्हा निष्पन्न होत असल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

३) आरोपींविरूध्द भारतीय दंड संहितेचे कलम १४३, १४७, ३२७, ३२३, ३३६, ५०४,५०६ अन्वये नि.क्र. २३ वर दोषारोप निश्चित करुन ते आरोपींना वाचून व समजावून सांगण्यात आले असता त्यांनी ते अमान्य करुन खटला चालविण्यात यावा असे कथन केले.

४) प्रकरणाच्या निश्चीतीकरिता माझ्या विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले असून त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १८/०७/२०२३ रोजी दुपारी ३-३० वाजेच्या सुमारास देऊळगांव सिध्दी, ता.जिल्हा - अहमदनगर येथे आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून त्या जमावाचा घटक झाले असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| २. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी फिर्यादी व त्याच्या मुलाला मारहाण करण्याच्या हेतुने बेकायदेशीर जमाव जमवून दंगा केला होता, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ३. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान हेतुच्या पुर्रस्सरनार्थ फिर्यादीचा मुलगा वैभव याच्या गळ्यातील १५ तोळे वजनाची सोन्याची चेन बळजबरीने काढून घेतली , व काढून घेताना फिर्यादीचा मुलगा वैभव यांस इच्छा पूर्वक दुखापत पोहोचविली हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ४. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान हेतुच्या पुर्रस्सरनार्थ फिर्यादी व त्यांचा मुलगा वैभव यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन स्वच्छेने दुखापत करुन जखमी केले, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ५. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान हेतुच्या पुर्रस्सरनार्थ फिर्यादीला दगडफेक करुन इतरची सुरक्षितता धोक्यात येईल असे कृत्य केले, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ६. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान हेतुच्या पुर्रस्सरनार्थ फिर्यादी, व त्याच्या मुलाला उद्देशपूर्वक शिवीगाळ करून, अपमान करून त्यायोगे त्याला प्रक्षोभित केले, अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा असा त्यामागे आरोपींचा उद्देश होता, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ७. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान हेतुच्या पुर्रस्सरनार्थ फिर्यादी, त्याच्या मुलाला धमकी देऊन अपराधीक धाकदपटशा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ८. | अंतिम आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## <u>कारणमिमांसा</u>

५) आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकार पक्षाने केवळ फिर्यादी व त्यांचा मुलगा वैभव यांना तपासले. आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये समेट झाल्यामुळे सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द कुठलाही पुरावा नसल्यामुळे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३ प्रमाणेचे आरोपीचे बयान वगळण्यात आले.

मुद्दा क्र. १ ते ७ करीता -

६) सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्याबाबतची चर्चा एकत्रीतपणे करते. रावसाहेब जाधव (सा.क्र.१) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि.०८.०४.२०२३ रोजी त्यांचे आरोपींसोबत किरकोळ वादावादी झाली होती. याव्यतिरीक्त काहीही घडले नव्हते. त्यांनी रागाच्या भरात पोलीस स्टेशनला जाऊन आरोपींविरुध्द तक्रार दिली होती. त्यांना आरोपींनी दगड फेकून मारला व तो त्यांच्या पोटाला डाव्या बाजूला लागला तसेच आरोपींनी त्याला व त्याच्या मुलाला लाथाबुक्कयांनी मारहाण केलयाचे अमान्य केले आहे. त्याच्या मुलाच्या गळयातील चैन हिसकावून घेतलयाचे व सदर भांडणामध्ये त्यांचे खिशातील दीड लाख रुपये, मुलाच्या खिशातील सत्तर हजार असे एकुण ८,२०,०००/- किंमतीचा मुददेमाल गहाळ झाल्याचे देखील त्याने अमान्य केले आहे. तसेच, त्यामुळे सरकारी वकीलांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला. परंतू त्यामध्ये देखील कोणतीही महत्वपुर्ण बाब अभिलेखावर आली नाही.

७) वैभव जाधव (सा.क.२) याने सुध्दा त्यांच्यात व आरोपींमध्ये किरकोळ वाद झाल्याचे सांगीतले. आरोपींनी त्यांचे वडीलांना दगड फेकून मारला व तो त्यांच्या पोटाला डाव्या बाजूला लागलयाचे अमान्य केले आहे. तसेच, आरोपींनी त्यांना व त्यांच्या वडीलांना लाथाबुक्यांनी मारहाण केली त्यांच्या गळयातील चैन हिसकावून घेतलयाचे देखील अमान्य केले आहे. सदर भांडणामध्ये वडीलांच्या खिशातील दीड लाख रुपये व त्यांच्या खिशातील सदर सत्तर हजार रुपये असे एकुण रक्कम रुपये ८,२०,०००/- किंमतीचा मुददेमाल गहाळ झाल्याचे अमान्य केले आहे. सदर दोनही साक्षीदारांनी सरकारपक्षाला सहकार्य न केल्याने सरकारी वकीलांनी त्यांची कसून उलटतपासणी घेतली. परंतू त्यामध्ये सरकारपक्षाच्या कथनाला दुजोरा देणारी कुठलीही बाब अभिलेखावर आली नाही. त्यामुळे वरिल दोन्ही साक्षीदारांच्या पुराव्याचा सरकारपक्षाला काहीही उपयोग होणार नाही.

८) आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्यासाठी घटनेच्या दिवशी मारहाण झाली किंवा रक्कम गहाळ झाल्याची बाब सरकारपक्षाने सिध्द करणे गरजेचे आहे. मात्र उपरोक्त एकही साक्षीदाराने आरोपींविरुध्द काहीही कथन केले नाही. तसेच सर्व साक्षीदारांनी सरकारी वकीलांनी घेतलेल्या उलटतपासात ते व आरोपी एकमेकांचे नातेवाईक असल्याचे व त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर समझोता झाल्याचे कथन करतात. त्यामुळे सदर साक्षीदारांनी सरकारपक्षाला

सहकार्य केल्याचे दिसुन येत नाही. करिता आरोपींविरुध्दचे वरिलप्रमाणेचे आरोप सिध्द होवु शकत नाहीत. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ७ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

मुद्दा क्र. १० बाबत

९) वरिल विवेचनावरुन सरकारपक्ष आरोपींविरुध्द कुठलाही गुन्हा शाबित करण्यास असमर्थ ठरल्यामुळे सर्व आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब मुद्दा क्र. १० च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

आदेश

१) आरोपी क्र. १) भारत विठ्ठल घायमुक्ते, आरोपी क्र.२ ) जितेंद्र उर्फ खंडु विनायक घायमुक्ते, आरोपी क्र.३) राजेंद्र उर्फ राजाराम दिनकर घायमुक्ते, आरोपी क्र.४)बाजीराव दिनकर घायमुक्ते, आरोपी क्र.५) बंटी उर्फ तुषार राजाराम घायमुक्ते, आरोपी क्र.६) दिपक मुरलीधर घायमुक्ते, आरोपी क्र.७) सागर विलास घायमुक्ते यांची भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम १४३, १४७, ३२७, ३२३, ३३६, ५०४,५०६ प्रमाणेच्या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपींचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम '४३७-अ' च्या पूर्ततेकामी प्रत्येकी रक्कम रूपये १५,०००/- चा जामीन कदबा सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत करण्यात आला)

PATIL ASHWINI BHUSHAN
Digitally signed by PATIL ASHWINI BHUSHAN
Date: 2026.06.01 17:27:00 +0530

दिनांक- ०१/०६/२०२६
अहमदनगर.

( श्रीमती. ए.बी. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. १,
अहमदनगर

परिशिष्ट -१

भाग - क

(फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)
अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/ बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार :

अ. अभियोगपक्षातर्फे-

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ – नि.क्र. ३५ | रावसाहेब ज्ञानदेव जाधव | फिर्यादी |
| सा.क्र. २ – नि.क्र. ३७ | वैभव रावसाहेब जाधव | फिर्यादीचा मुलगा |

ब.बचावाचे साक्षीदार, जर असतील तर -

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| – | – | -- |

क.न्यायालयाचे साक्षीदार, जर असतील तर -

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ... | ... | ... |

फिर्यादी/आरोपी न्यायालयाव्दारे निशाणी क्रमांक देण्यात आलेल्या दस्तांची यादी -
अ.अभियोग पक्षातर्फे -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३६ | फिर्याद |
| २. | ४१ | घटनास्थळ पंचनामा |

ब. बचावपक्ष -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ... | ... | ... |

क.न्यायालयीन निशाणी -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | - | - |

ड. वस्तू -

| अ.क्र. | निशाणी | वर्णन |
|---|---|---|
| १) | .. | -- |

PATIL ASHWINI BHUSHAN
Digitally signed by PATIL ASHWINI BHUSHAN
Date: 2026.06.01 17:27:06 +0530

दिनांक- ०१/०६/२०२६
अहमदनगर.

( श्रीमती. ए.बी. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. १,
अहमदनगर